एआरएन परिपत्रक
आरबीआय/२००८-०९/४३०
आरपीसीडी.सीओ.बीसी क्र.९६/०७.३८.०१/२००८-०९ दि. एप्रिल १३,२००९

सर्व राज्य/केंद्रीय सहकारी बँका (एसटीसीबी/डीसीसीबी)

महोदय,

**सहकारी बँका (नामनिर्देशन) नियम,१९८५ - नामनिर्देशनाची पोच व पासबुके/स्थिर ठेवींच्या पावत्या ह्यावर नामनिर्देशिताचे नाव निर्देशित करणे.**

आपणास माहितच आहे की, सहकारी बँका (नामनिर्देशन) नियम,१९८५ च्या नियम २(९),३८८ आणि ४(९) च्या अनुसार, ठेवीदार/लॉकर धारकांना त्यांनी सादर केलेल्या नामनिर्देशन/रद्दीकरण आणि किंवा नामनिर्देशनात बदल ह्यांच्या फॉर्मची पोच लेखी द्यावयाची आहे. तथापि आमच्या नजरेस असे आणण्यात आले आहे की काही बँका ह्या आवश्यकता पूर्ण करत नाहीत. ह्याशिवाय काही बँकांमध्ये, बचत खाते उघडण्याच्या फॉर्ममध्ये दिल्यानुसार नामनिर्देशनाची पोच द्यावयाची प्रणाली अस्तित्वात असूनही काही बँकामध्ये, बचत खाते उघडण्याच्या फॉर्ममध्ये दिल्यानुसार नामनिर्देशानाची पोच द्यावयाची प्रणाली अस्तित्वात असूनही काही बँका ग्राहकांना तशी लेखी पोच देत नाहीत.

२) ह्यासाठी बँकाना सांगण्यात येत आहे की त्यांनी बँकिंग रेग्युलेशन अधिनियम,१९४९ च्या (एएसीएस) आणि सहकारी बँका (नामनिर्देशन) नियम,१९८५ च्या तरतुदींचे काटकोरपणे पालन करावे आणि नामनिर्देशन, रद्दीकरण, आणि/किंवा नामनिर्देशनात बदल करावयाच्या पूर्णपणे भरलेल्या फॉर्मची पोच देण्याची प्रणाली तयारी करावी. ग्राहकाची मागणी असो अथवा नसो, अशी पोच सर्व ग्राहकांना दिली जावी.

३) बँकेच्या एखाद्या खातेदाराने नामनिर्देशन सुविधेचा लाभ घेतला असल्यास त्याच्या/तिच्या पासबुकवर त्याचा निर्देश केला जावा त्यामुळे त्या खातेदाराचा मृत्यु झाल्यास त्याच्या नातेवाईंकाना केवळ पासबुकवरुनच समजेल की त्या खातेदाराने नामनिर्देशनाचा लाभ घेतला आहे. व ते त्याबाबत सुयोग्य कृती करतील. त्यानुसार खातेदाराने नामनिर्देशनाची सुविधा घेण्याबाबतची स्थिती, पासबुकवरच नामनिर्देशन पंजीकृत असे लिहून/शिक्का मारुन सुरु करण्याची प्रथा बँकांनी तयार करावी मुदत ठेवींच्या पावत्यांवरही असेच करता येईल.

४) ह्याशिवाय, ग्राहकाची अनुमती असल्यास त्याचे पासबुक/लेखा विवरणपत्र/एफडीआर ह्यावरही नामनिर्देशिताचे नाव निर्देशित करण्यास बँकांना सांगण्यात येत आहे. ह्यामुळे नामनिर्देशित/ग्राहक ह्यांना मदतच होईल.

आपला
(बी.पी.विजयेंद्र)
मुख्य महाव्यवस्थापक